श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक.

वर्ष ११ अंक ८ ] आश्विन [ श. १८५६

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम्



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका

—शंकराचार्य.

संपादकः—रामचंद्र आत्माराम तर्खड

6-11-34

# अनुक्रमणिका

पृष्ठ


श्रीसाईनाथ महिम्नस्तोत्र मराठी भाषांतर ... ... १-४
रज:संपर्कदोषाचें एक प्रत्यक्ष उदाहरण ... ... ... ५-६
दोन हरीभाऊंमधला गैरसमज ... ... ... ... ७-९
प्रभुरायाच्या चरणसेवेंतील अनुभव ... ... ... ... १०-२७
स्फुट विषय ... ... ... ... ... ... २८
सप्टेंबर महिन्याचें शिर्डीवृत्त ... ... ... ... २९-३२


# विनंति

वर्गणीदारांस नम्र विनंती करण्यांत येत आहे कीं, या सालीं V. P. करण्यांत आली नसल्यामुळें ज्यांनीं वर्गणी अद्यापि पाठविली नाहीं, त्यांनीं कृपा करून ती खालील पत्यावर पाठवून द्यावी. अथवा V. P. करण्याचें सुचवावें.

**रा. आ. तर्खड,**

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला**

५१ E, पाली रोड; खार, मुंबई २१; आणि ऑ. खजिनदार,

**श्रीसाईबाबा शिरडी संस्थान**


सुप्रसिद्ध श्री. मोरोपंत कविकृत **केकावलि** या भक्तिरसप्रेमामृतानें ओथंबलेल्या काव्यावर कै. रा. ब. दादोबा पांडुरंग यांची "यशोदा पांडुरंगी" टीका जी साठ वर्षांपूर्वी छापून प्रसिद्ध झाली होती व आजमितीस अत्यंत दुर्मिळ झाली होती, तिची दुसरी आवृत्ति छापून तयार झाली आहे. किं. रु.२

**रा. आ. तर्खड,**

व्यवस्थापक —**श्रीसाईलीला कचेरी**


## श्रीसाईभक्तांस विज्ञप्ति

कोणाला श्रीसाईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्रीसाईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमच्याकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

**रा. आ. तर्खड,**

—प्रकाशक

# मराठी

## श्रीसाईनाथ महिम्नस्तोत्र समश्लोकी भाषांतर
## श्री दत्तचित्साईसद्गुरुभ्योनमः

श्रीयुत श्रीसाईलीला संपादकमहाशय यांस,

कृ: शि. सा. न. वि. वि. श्रीशिरडी संस्थान, सन्मान्य सेक्रेटरी, श्री. सुंदरराव दीनानाथ नवलकर यांच्या आज्ञेवरून " श्रीसाईनाथ सगुणोपासना " या पुस्तकांतील " श्रीसाईनाथ महिम्नस्तोत्र " या संस्कृत स्तोत्राचें समश्लोकी मराठी भाषांतर करून आपल्याकडे पाठविलें आहे. त्याचा हेतु असा कीं, ज्या कोणा साईभक्तांस संस्कृत " श्रीसाईनाथ महिम्नस्तोत्र " पाठ करण्यास त्रास पडतो व अर्थही कळत नाहीं, त्यांनीं त्याच अर्थाचें हें मराठी " साईनाथ महिम्नस्तोत्र " पाठ करावें व भक्तीनें व प्रेमानें म्हणावें. हेतु अत्यंत शुद्ध व स्तुत्य आहे. हें मराठी स्तोत्र समश्लोकी आहे. म्हणजे संस्कृत श्लोकांत ज्या ज्या ठिकाणीं जें वृत्त घातलें आहे, तेंच वृत्त त्या त्या ठिकाणीं मराठींतही कायम ठेविलें आहे व असें करतांना मुळांतील अर्थ होतां होई तों सोडला नाहीं व स्तोत्राचा व त्यांतील संस्कृत शब्दांचा अर्थ नीट ध्यानांत येण्याकरतां खालीं भरपूर टिपा दिल्या आहेत.

श्री. सुंदरराव यांनीं हें काम मला लवकर करावयास सांगितलें होतें. पण मी विसराळू; हें काम करण्यास इतर व्यवसायामुळें विसरलों. त्यांनीं पुनः दोन वेळा मला जेव्हां स्मृति दिली, तेव्हां मी खडबडून जागा होऊन भाषांतर करून आपणाकडे पाठवीत आहें. कृपेनें हें मराठी स्तोत्र श्री. सुंदरराव यांच्या उत्कंठेप्रमाणें होतां होईल तों आपल्या येत्या श्रीसाईलीलेच्या अंकीं छापून प्रसिद्ध करावें, म्हणजे मला लागलेला विलंब पुष्कळ अंशीं भरून निघेल.

आपला नम्र सेवक

ठाणें.
गुरुवार, भाद्रपद कृ. ११

बाबांचें बाळ

श्रीदत्तत्रिसाईसद्गुरुभ्योनमः

## " श्रीसाईनाथ सगुणोपासना " या पुस्तकांतील " श्रीसाईनाथ महिम्नस्तोत्र " या संस्कृत स्तोत्राचें समश्लोकी मराठी भाषांतर

### भुजंगप्रयात वृत्त

सदा सत्य तूं ज्ञान आनंदकंदा । जगज्जन्म, आधार, संहार छंदा ॥
स्वभक्तस्पृहीं त्यं होशी अनंता । नमो ईश्वरा, सद्गुरु साईनाथा ॥ १ ॥
भवांधार नाशोर्क, तूं स्तोत्र योग्या । मना वाणिच्या पैल तूं योगलभ्या ॥
जगद्व्यापका निर्गुणा पातकांता । नमो ईश्वरा० ॥ २ ॥
प्रपंचाब्धिमाजी बुडाल्या जनांच्या । तुझ्या ठायिं भक्ति प्रिया संश्रितांच्या ॥
कलीमाजि तूं जन्मसी तारणार्था । नमो ईश्वरा० ॥ ३ ॥
सदा निंबमूलीं तुवां वास केला । कटुत्वा मुके निंब स्रावी सुधेला ॥
गमे कल्पवृक्षाहुनी श्रेष्ठ आतां । नमो ईश्वरा० ॥ ४ ॥
तुझा भाव ठेवूनि त्या श्रेष्ठ मूळीं । तया पूजिती सेविती जे समूळीं ॥
सदा तूं तया भोग मोक्षप्रदाता । नमो ईश्वरा० ॥ ५ ॥
कधी ऐकिल्या तर्किल्या ज्या न लीला । करूनीच त्या दाविसी ईशतेला ॥
प्रसन्नांतरा तूं तुला ना अहंता । नमो ईश्वरा ॥ ६ ॥
तवानंद, साधू सुखाशांति माजी । नमूनी स्तवीते तुला साधु राजी ॥
जनानंद तूं भक्त मांगल्यदाता । नमो ईश्वरा । ७ ॥
परब्रह्म तूं एक आद्या अजन्मा । स्वयंभूहि तूं मूर्त सीताभिरामा ॥
तुझ्या दर्शनें पावलों मी शुचीता । नमो ईश्वरा ॥ ८ ॥

---

१ इच्छेमुळें. २ मनुष्य. ३ संसाररूपी अंधाराचा नाश करणारे सूर्य. ४ वाचेच्या. ५ सेवकांना, आश्रितांना. ६ स्रवतो, पाझरतो, रस देतो. ७ अमृताला. ८ निंबवृक्षाचें मूळ म्हणजे प्रत्यक्ष तूंच आहेस अशी भावना. ९ सर्वस्वी. १० परमात्मसत्तेला किंवा सामर्थ्याला. ११ अंतर=आत्मा. १२ पंक्ति, समुदाय. १३ मूर्तिमंत, साक्षात् १४ सीतेला रमविणारा म्हणजे रामचंद्र प्रभु. १५ पवित्रता.

## शार्दूलविक्रीडित वृत्त

साईशा, सकल जनां, सुखनिधे, सर्वार्थ सिद्धिप्रदा[1] ॥
त्वत्पादांबुज[2] धूलितेज, न शके ब्रह्माहि वानूं कदा ॥
आलों मी शरण प्रभो द्वयकरा जोडोनि प्रेमें तुला ॥
पायावीण तुझ्या न योग्य शरणा जाण्या दुजा रे मला ॥ ९ ॥

## रथोद्धता वृत्त

साइरूपधर तूं रघुवरा[3] । कामधेनु निज सेवकां खरा ॥
मोहमग्न[4] मनबुद्धि लागुनीं[5] । चिंतितों तुज सुखें सदा मनीं ॥१०॥

## उपेंद्रवज्रा वृत्त

शरद्विधूतुल्य[6] प्रकाशराया[7] । तव कृपाछत्र[8]सुशीत छाया ॥
त्वत्पाद पद्माश्रित[9] भक्त तापा । त्वरें विनं[10]शो गुरु मायबापा ॥११॥
उपास्य तूं दैवत साइदेवा । तुला स्तवीलें अति प्रेमभावा ॥
रमो पदीं चित्त तुझ्या असंगा[11] । रमे जसा कंज[12] मधांत भृंगा ॥१२॥

## वंशस्थ वृत्त

अनंत जन्मांतर पाप संचया । लयास त्वद्दर्शन नेइ निश्चयां[13] ॥
प्रमाद सारे मम तूं क्षमा करीं । प्रसन्न हो साइगुरो दया करी ॥१३॥

## वसंततिलका वृत्त

जे शुद्ध, सद्गुरुपदामृतसेवनानें । जे जाहले गुरुपदीं र[14]त चिंतनानें ॥
ते पापसंचयभ[15]वांतुनि मुक्त होतां । अक्षय्य शांतिपद[16] प्राप्त करून घेतो ॥१४॥

---

१ धर्म, अर्थ, काम, व मोक्ष या चारी पुरुषार्थांची प्राप्ती करून देणारा. २ पाद=चरण. अंबुज=कमळ. धूलि=धूळ. तेज=प्रताप, पराक्रम=तुझ्या पायाच्या किंवा तुझ्या चरणकमलाच्या धूळीचा पराक्रम. ३ श्रेष्ठ. ४ मोहांत बुडालेलें ५ करतां, साठीं ६ शरद्=हिंवाळा. विधु=चंद्र; तुल्य=सारखा.=हिंवाळ्यांतील चंद्रासारखा. ७ राया=साईराया. ८ थंडगार सावली देणारी तुझी कृपारूपी छत्री. ९ कमल. १० समूळ नाश करो. ११ वैराग्यशीला. १२ कमल. १३ खात्रीनें. १४ रंगले, मले. १५ पापाचा सांठा जो संसार त्यांतून. १६ मोक्ष, मुक्ति, कैवल्य.

## अनुष्टुभ वृत्त

करूनी तन्मया[1] वृत्ती । जो म्हणे स्तोत्र हें सदा ॥
भक्तीनें, साईनाथाच्या । कृपेला पात्र सत्य तो ॥१५॥
साईकृपा कल्पवेली । पद्यांची सुमनमालिका[2] ॥
गुंफिली प्रेमसूत्रीं ग्यां । चित्तशुद्धि गतिस्तत्र[3] ॥१६॥
दीन मी दास दुबळा । तैसा अज्ञान मुर्ख ही ॥
त्वत्कंठीं अर्पितों प्रेमें । माला ही साईसद्गुरो ॥१७॥

ठाणें,
गुरुवार, भाद्रपद कृ. ११
शके १८५६, ता. ४-१०-३४

श्रीसाईपदरज दासानुदास,
नाथांचे बाळ

१ परमात्ममय, सद्गुरुमय. २ फूल. ३ मोक्ष.

# रज:संपर्कदोषाचें एक प्रत्यक्ष उदाहरण

(हंस, सातारा-गुरुवार ता. २७ माहे सप्टेंबर सन १९३४ च्या अंकावरून )

श्री. ब्रह्मदत्तजी शर्मा या गृहस्थांनीं ' कल्याण ' हिंदी मासिकच्या गेल्या पौषच्या अंकांत 'चरित्रबल' या लेखांत—उदाहरण म्हणून खालील माहिती दिली आहे.

" यंदा यात्राकार्यार्थ फिरत असतां हरद्वार येथें अकिंचन अशा एका महान् पुरुषाच्या दर्शनाचा मला लाभ झाला. त्यांची अंत:शक्ति आणि ज्ञानकोश यांचें अनुमान करणें, माझ्यासारख्या साधारण मनुष्याच्या सामर्थ्याबाहेरची गोष्ट आहे.

एके दिवशीं भोजनोत्तर तिखट-मिर्ची घातलेल्या अन्नसेवनानें तोंडाची जशी स्थिति होते, तशी त्या महात्म्याची स्थिति झालेली पाहिली. परंतु या पदार्थांत नांवालासुद्धा मिर्चीचा कांहीं उपयोग केला नव्हता. त्यांच्याजवळच बसलेल्या एका जिज्ञासु गृहस्थानें पृच्छा केली कीं, 'पूज्य-पाद! हें असें काय होत आहे ? भोजनांत मिर्ची मिळाल्यामुळें तोंडांत जळ-जळ होत आहे काय ?' ज्या गृहस्थांकडून भोजनपात्र वाढून आलें होतें, तेही जवळच होते. त्यांनीं सांगितलें कीं, " स्वयंपाकांत मिर्ची न घालण्याबद्दल घरांतील मंडळीस निक्षून सांगितलें होतें; असें असतां कदाचित् निष्काळजी-पणानें भाजीपाल्यांत एखादी मिर्ची पडली असेलही." त्यावर पूज्यपाद म्हणाले, "नाहीं, भोजनांत मिर्ची होती असें मला मुळींच वाटत नाहीं; त्याला दुसरेंच कांहीं तरी कारण असेल. विकृत भोजनापासूनही असें होऊं शकतें व त्यामुळें तोंडांत फोड उत्पन्न होत असतात." सायंकाळीं स्वामीजींना भेटल्यावर त्यांच्या तोंडांत फोड उत्पन्न झालेले दिसून आले. माझ्या मित्रानें आपल्या घरीं तपास केल्यावर समजून आलें कीं, भोजनांतील कोणत्याही पदार्थांत मिर्ची बिलकुल घातलेली नव्हती; परंतु दुसरी गोष्ट समजली कीं, थोडे दिवस माहेरीं राहण्यासाठीं म्हणून त्यांची बहीण आली होती, ती रज-

स्वला स्थितींत असतांना तिनें फक्त भाजी चिरून दिली होती. त्या संपर्काच हा परिणाम आहे, असें समजल्यावर सर्व मंडळी आश्चर्यचकित झाली.

अशा संपर्कदोषाचा प्रभाव आम्हांसारख्या लोकांवर होऊं शकेल काय ? नाहीं. कारण सूक्ष्मदृष्ट्या पावनऋषींनीं आज्ञापिलेले भोजनाचार आपल्यापासून पालन केले जात नसल्यामुळें ते अत्यंत मलिन झाले आहेत, त्यामुळें आहारांतील दोषानुभव प्राप्त होण्याला आम्हीं सर्वस्वी असमर्थ झालों आहोंत. स्वच्छ व उज्ज्वल वस्त्रावरच एखादा डाग पडला, तर तात्काल दिसून येतो, तसा मलिन वस्त्रावरचा डाग दिसून येत नाहीं. इतरवर्णीयांमध्यें रजोदोष पाळण्यांत बरीच दक्षता दिसून येते, पण उच्चवर्णी ब्राह्मण समाजांत अलीकडे तो दोष न पाळण्याकडे प्रवृत्ति होत असलेली दिसून येते, ही दुर्दैवाची गोष्ट होय.

वासुदेव अनंत चांदेकर

# दोन हरिभाऊंमधला गैरसमज

( विविध वृत्त ता. ३०-९-३४ वरून )

विविध वृत्ताच्या ता. २३-९-३४ च्या अंकांत डॉ. परांजपे, लखनौ युनिव्हर्सिटीचे व्हाइस चॅन्सलर, यांचा बुवाबाजीच्या तंत्रावरील वीस वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेला लेख मराठींत भाषांतर करून दिला होता, व आजच्या अंकांत त्यांचाच दुसरा लेख दिलेला आहे. 'टाइम्स ऑफ इंडिया'मध्यें त्या वेळीं Behind the Indian Veil या सदराखालीं लेख येत असत व ते लोकप्रिय झालेले होते. मी हे लेख नियमानें वाचीत असें. सदरील मथळ्याखालीं येणारे लेख रँग्लर परांजपे, श्री. के. नटराजन्, कै. न्या. सर नारायणराव चंदावरकर, कै. एच. नारायणराव ( ईस्ट अँड वेस्ट व व्हाइस ऑफ् इंडिया यांचे संपादक ) इत्यादि वेगवेगळ्या लेखकांचे असत. अर्थातच अमक्याचा अमुक लेख असें वाचकांना निश्चित कळण्यास कांहीं मार्ग नव्हता. रँ. परांजप्यांचे बुवाबाजीवरील सदरील लेख प्रसिद्ध झाले, तेव्हां गुरूंच्या नादीं लागलेल्या सुशिक्षित लोकांत मोठी खळबळ उडाली होती. कित्येकांना त्या लेखांतल्या वर्णनांत आपलें व आपल्या गुरुचें चित्र रेखाटलें असल्याचाही भास झाल्या-खेरीज राहिला नाही. कै. हरि सीताराम दीक्षित, सॉलिसिटर, हे त्या वेळीं शिरडीच्या साईबुवांच्या भजनीं लागलेले होते. हे लेख आपल्याच निकटवर्ति मित्रपरिवारांतल्या कोणी तरी लेखकानें लिहिले असावेत असा त्यांचा समज झाला व त्यांना आपले स्नेही हरिभाऊ आपटे यांचा दृढ संशय आला. हरिभाऊ दीक्षित हे आपल्या गुरुभक्तीच्या बाबतींत खरोखरच एकनिष्ठ होते. त्यांचा स्वभाव दिलदार व प्रेमळ होता. आपल्या मित्रांशीं अत्यंत सच्चेपणानें ते वागत असत. परंतु आपल्या गुरूच्या विरुद्ध कोणी कांहीं बोलला, तर तें त्यांना आवडत नसे. तें ऐकून त्यांचें अंतःकरण अत्यंत व्यथित होई. मरहूम सर फेरोजशाह मेहता यांना हरिभाऊ दीक्षित आपले राजकीय गुरु मानीत, आणि त्यांच्या सांगण्याबाहेर केव्हांही वागत नसत. हरिभाऊ गुरूच्या नादीं लागलेले पाहून सर फेरोजशाहांना वाईट

वाटत असे. एकदा हरिभाऊंशीं बोलतांना ते म्हणाले, " दीक्षित, तुमच्यासारख्या सुशिक्षित गृहस्थानें एखाद्या बुवाजीच्या नादीं लागावें हें शोभतें काय? तुमचा आतांपर्यंतचा सार्वजनिक आयुष्यक्रम इतका उज्ज्वल व आशादायक आहे कीं, तुमच्या डोक्यांत हें गुरुबाजीचें वेड शिरलेलें पाहून माझ्यासारख्या तुमच्या मित्रांना अतिशय वाईट वाटल्याखेरीज राहत नाहीं. ही गुरुबाजी तुमच्या सार्वजनिक जीवनाचें मातेरें करीत आहे." सर फेरोजशहा यांचे हे शब्द ऐकल्याबरोबर हरिभाऊ म्हणाले, " सर फेरोजशाह, राजकारणांत तुम्ही माझे पाहिल्यापासून गुरु आहां व आजही तुम्हांला मी माझे गुरुच मानतों. परंतु मुंबईला जसे राजकारणांत तुम्हा माझे गुरु, तसे परमार्थांत शिरडीचे साईमहाराज माझे गुरु आहेत. मुंबईत असतांना तुमचें दर्शन घेतल्याखेरीज माझा एक दिवस जात नाहीं, हें तुम्हांला ठाऊकच आहे. तशीच निष्ठा परमार्थांत साईमहाराजांवर माझी आहे. राजकीय बाबतींत तुमच्यावरची माझी निष्ठा जशी कालत्रयीं ढळणार नाहीं, तशी परमार्थाच्या मार्गांत साईमहाराजांवरील माझी निष्ठाही कधीं ढळणार नाहीं." हरिभाऊंचें हें विनययुक्त पण सत्यपूर्ण व निश्चयात्मक उत्तर ऐकून सर फेरोजशाह पुढें कांहीं बोलले नाहींत. हरिभाऊंविषयींचा त्यांचा आदर व प्रेम ही द्विगुणितच झालीं. हरिभाऊ दीक्षितांची गुरुनिष्ठा अशी तीव्र असल्यामुळें टाइम्स ऑफ इन्डियामधल्या सदरील लेखाचें जनकत्व हरिभाऊ आपटयांकडे आहे असें त्यांच्या मनानें घेतांच एकदा हरिभाऊ आपटे भेटले असतां त्यांना ते म्हणाले, " छान, आपल्या मैत्रीचें सार्थक केलेत!" हरिभाऊ आपटयांना या शब्दाचा अर्थ अर्थात्च कळला नाहीं व ते आश्चर्यचकित झाले आणि त्यांना खुलासा विचारला. दीक्षितांनीं गुरूबाजीवरील टाइम्समधल्या लेखांचा उल्लेख केला, तेव्हां आपटयानीं ते लेख आपले नव्हत असें त्यांना सांगितलें व त्यांचा आपल्यावरील राग दूर केला. पुढें एके दिवशीं रँ. परांजपे यांनीं हरिभाऊ आपटयांशीं बोलतां बोलतां सदरिल लेख आपण लिहिले होते असें सांगितलें,

तेव्हां हरिभाऊंनी त्यांना त्या लेखांचा आळ आपल्यावर कसा आला होता, त्याची हकीकत सांगितली. हरिभाऊ दीक्षितांशीं माझा पत्रव्यवहार असे व माझ्यावर त्यांचा मोठा लोभ असे. कोणालाही पत्र लिहिलें, तरी त्यांत शेवटीं ' Herewith Shri 's उदी' ( बाकीच्या दोन इंग्रजी शब्दाबरोबर 'उदी' हा शब्द ते बाळबोधींत लिहीत ), हे शब्द असावयाचेच. मला आलेल्या प्रत्येक पत्रांत हरिभाऊंनीं हे शब्द लिहिलेले आहेत. मला वाटतें, सर फेरोजशहांनाही पत्रद्वारें हरिभाऊंकडून श्रींच्या उदीचा लाभ होत होता !

लेखांक ५ वा

# आमचे शिरडींतील प्रभुरायाच्या चरणसेवेंतील ५६ परमानंदाचे दिवस व त्यांत व त्यानंतरचे चमत्कार व अनुभव

श्रीसाईसद्गुरुभ्योनमः

श्रीसाईलीला संपादकमहाशय यांस,

कृ. शि. सा. न. वि. वि. खालील अनुभवांस आपल्या श्रीसाइ-लीलेच्या एखाद्या अंकीं स्थल द्यावें अशी नम्र प्रार्थना आहे.

## आमचे श्रीक्षेत्र शैलधी ऊर्फ शिरडी येथील श्रीचरणसेवेंतील अत्यानंदाचे ६२–६=५६ दिवस व त्या दिवसांत व त्यानंतर आलेले अनुभव व चमत्कार

शके १८५४ सालच्या दिवाळीची गोष्ट. त्या दिवाळींत मी कांहीं कामाकरितां सातार्‍यास गेलों होतों. तेथें मी एक महिनाभर होतों. त्या अवधींत माझा कनिष्ट चिरंजीव श्री. श्रीपाद ऊर्फ बाबुराव याचें मला पत्र आलें कीं, त्याचें कुटुंब चि. सौ. उमाबाई हिला एकाएकीं दिवसांतून एकदोन वेळां मूर्च्छा (fit) येते व ती थोडा वेळ बेशुद्ध पडते. वैद्याचे उपाय सुरू केले आहेत. तुम्हीं लवकर निघून यावें. मीं लिहिलें कीं, तुम्हीं करतां ते उपाय करा; पण माझा उपाय म्हणून नित्य नेमानें बाबांची उदीलेपन, भक्षण, श्रीसाईसच्चरिताध्यायवाचन व बाबांना तुलसीपत्रार्पण, इतकें चि. सौ. उमानें न चुकतां, न विसरतां करावें. मी सातार्‍याहून परत ठाण्यास आलों व पाहिलें तो सूनबाईनं मीं लिहिल्याप्रमाणें करण्याचें सुरू केलें होतें. तिला मूर्च्छा येतच होती व ती अत्यंत अशक्त झाली होती. जवळ जवळ महिनाभर औषधोपचार सुरू असतां ती इतकी अशक्त कां झाली, असें वैद्यराजांना विचारतां मीं औषध देऊन

व कडक अनुपान व पथ्य सांगून तिला मुद्दामच अशक्त केली आहे असें ते म्हणाले. लवकरच तिची मुर्च्छा बंद होऊन तिला शक्ति येईल असें मी तिला औषध व पाक देत आहें असेंही ते बोलले. त्यांचें औषध दोन महिने दिलें, गुण नाहीं; इतकेंच नव्हे, तर चि. सौ. उमा दिवसें-दिवस इतकी थकत चालली कीं, तिचें पाऊल तिला उचलेना, तिची खोली व तिचा पलंग तिला सुटेना, ती दिवस व रात्र मिळून जवळजवळ १७-१८ तास झोंप घेई. तिला घासभर भात जात नसे. पोळी-तुकडा मुळींच सोसत नसे. जरा थोडी पोळी खाल्ली, कीं लागलीच पोट दुखे व दोनतीन वेळा शौचास जावें लागे.

नंतर तिच्या वडिलांनीं तिला मुंबईस नेऊन डॉक्टर + + + यांचें औषध एक महिनाभर दिलें. गुण नाहीं. काय भावना आहे तें ती सांगेना. नंतर आम्ही तिला ठाण्यास आणून श्री. शास्त्री यांचें औषध देऊं लागलों. त्या औषधापासून तिची मूर्च्छा राहिली, पण अशक्तपणा कमी झाला नाहीं. शास्त्री यांचें औषध एक महिनाभर दिलें. ते म्हणाले, तिला क्षयाची छटा आहे. पण तो रोग वाढत नाहीं. अटकून बसलेला आहे. शक्ति येण्यास बरेच दिवस लागतील. आमच्या घरांतील मंडळीस धीर निघेना. आम्ही तिला रोज सकाळीं व रात्रीं नेमानें गाईचें पावशेर पावशेर दूध देत असों व हल्लींही अद्यापपावेतों देतोंच. कारण औषध लागू पडेना. भाताची शिसारी. पोळीतुकडा सोसावयाचा नाहीं. शरीरांत थेंबभर रक्त उरलें नाहीं. पांढरी फटक दिसूं लागली. आम्ही सर्वच घाबरलों. तिचा जीव काय तो त्या दुधावर असे. आमचे नातेवाईक कल्याणचे डॉक्टर श्री. + + + यांनीं येऊन तिला तपासली व मी हिला खात्रीनें बरी करतों, तुम्हीं मला एकवार संधि देऊन तर पाहा असें ते म्हणाले.

नंतर आम्ही त्यांचें औषध व (इंजेक्शनस्) अंतःक्षेपणें सुरू केलीं. हा क्रम आठ महिने सुरू होता. या दरम्यान ५२ अंतःक्षेपणें झालीं

साधारण बरें वाटे. पण वरिकसारिक काम करण्याइतकी सुद्धा शक्ति अंगांत येईना. बरें वाटूं लागलें म्हणजे रोग्यानें थोडथोडें तरी काम करावें किंवा थोडा थोडा व्यायाम घ्यावा असें डॉक्टर + ++ यांचें पहिल्या प्रथम मत होतें. पण तें मागून बदललें व चि. सौ. उमाबाईनें काम मुळींच करूं नये, पण पूर्ण विश्रांति घ्यावी असें सांगूं लागले. पण विश्रांति म्हणजे काय ? रोज १८-२० तास झोंप घेणें म्हणजे विश्रांती कीं काय ? अशा विश्रांतीनें गात्रें कार्यक्षम कशीं राहतील ? त्यांना काम न करण्याची सवय लागेल व तीं कायमचीं नवळीं होतील असें आम्हीं त्यांना विचारलें. पण त्याच त्यांच्याकडून चांगलासा खुलासा मिळेना. हवा बदलण्यास दुसरीकडे घेऊन जाऊं का, असें विचारतां तूर्त तिला येथून कोठेंही हलवूं नका. हवा बदलण्यास केव्हां जावयाचें हें पुढें सांगेन, असें ते म्हणाले. तिच्या प्रकृतींत पुष्कळ सुधारणा आहे असें ते बोलत.

तिच्या वडिलांचें असें म्हणणें होतें कीं, तिला मुंबईस नेऊन पुन्हा डॉक्टर + + + यांनाच दाखवावी व त्यांचेंच औषध घ्यावें. आम्ही विचार केला कीं, मुंबईंत या रोगावर अधिकृत रीत्या मत देणारे व उत्तम नामांकित परीक्षक डॉक्टर + + + आहेत त्यांना दाखवूं म्हणजे झालें. आम्हीं तसेंच केलें. डॉक्टर + + + यांनीं कल्याणचे डॉक्टर यांच्याच परीक्षेस मान्यता दिली. पण अद्याप रोगभावना तिळभरही कमी झाली नाहीं व जुन्या पद्धतीचीं कनकांतःक्षेपणें घ्यावीं असें त्यांनीं सुचविलें. कल्याणचे डॉक्टर +++ हे दत्तभक्त असून त्यांचें वर्तन सदाचाराचें, निर्व्यसनी व जुन्या धार्मिक पद्धतीचें आहे. परंतु त्यांचा डॉक्टरीचा धंदा मात्र अगदीं नवीन मताचा व नवीन मताचा व नवीन पद्धतीचा आहे. त्यामुळें मुंबईचे प्रसिद्ध डॉक्टर + + + यांची कांचनअंतःक्षेपणें देण्याची जुनी पद्धत त्यांना पटली नाहीं. त्यांनीं नवीन पद्धतीचींच अंतःक्षेपणें सुरू ठेविलीं. एकंदर ५२ अंतःक्षेपणें झालीं. अंतःक्षेपणें देऊन देऊन सूनबाईच्या दोन्ही हातांचें जाळें झालें. तिला त्या वेदना सहन होईनात. ती रडे. आम्हासही तिच्या यातना पाहून वाईट

वाटे. पण करणार काय ? असो. याप्रमाणें जवळजवळ आठ महिने गेले. अंत:क्षेपणापासून तिला तात्पुरतें बरें वाटे. पण तिच्या खाण्यापिण्यांत किंवा शक्तींत मुळीच फरक दिसला नाहीं.

मनुष्य कितीही नवमतवादी किंवा सुधारणाप्रिय असला, तरी नवीन उपायावर सर्वस्वी भिस्त ठेवून त्याचें चालत नाहीं व कित्येक वेळां प्रामाणिक डॉक्टर व वैद्य सांगतात, कीं आतां आमचें कांहीं चालत नाहीं. तुम्हीं तुम्हांस सुचतील ते इतर इलाज करा. डॉक्टर व वैद्य यांच्या औषधानें गुण येत नाहीं असें मनुष्याला वाटूं लागलें म्हणजे "A drowning man catches at a straw" ( पाण्यांत बुडणारा मनुष्य गवताच्या काडीचा आश्रय करतो. ) या म्हणीप्रमाणें जो कोणी जें सांगेल तसें तो करण्यास प्रवृत्त होतो, देवभोळा बनतो व अंधश्रद्धही होतो. असो. त्याप्रमाणें माझे धाकटे बंधु पौड गांवीं आहेत. ते वैद्यकीचा धंदा करतात. त्यांचा कुलस्वामीवर विलक्षण विश्वास आहे. माझे चिरंजीव एलएल्. बी. आहेत त्यांनीं माझ्या धूस सुनबाईच्या दुखण्याबद्दल विचारलें असतां त्यांनीं कळविलें कीं, तिला अनसें खावयास देऊन शिरडीस पाठवावी, अशी कुलस्वामीकडून त्यांना प्रेरणा झाली.

त्यानंतर नवरात्रांत कित्येक कोंकणस्थ लोकांत पिठाची मोठी महालक्ष्मी करून रात्रीं तिच्यापुढें घागरी फुंकतात. त्या वेळीं जी बाई घागर फुंकते तिच्या अंगांत महालक्ष्मी येते व ती घुमते व तिला विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें देते, किंवा कोडयांचा उलगडा करते, अशी समजूत आहे. त्याप्रमाणें आमच्या घराशेजारीं श्री. वैद्यांच्या घरीं गेल्या नवरात्रांत एके रात्रीं एका अपरिचित बाईच्या अंगांत देवी आली व घुमावयास लागली. माझ्या घरांतील मंडळींनीं तिला सुनबाईच्या दुखण्याबद्दल प्रश्न विचारला. एका वर्षाच्या आंत आम्ही सूनबाईला शिरडीस घेऊन जावें म्हणजे दुखणें बरें होईल असें देवीनें सांगितलें. वास्तविक पाहतां या बाईस शिरडी कोठें आहे व कशाकरतां प्रसिद्ध आहे हें बिलकुल माहित नव्हतें. असें असतां

तिनें सूनबाईला शिरडीसच घेऊन जावें म्हणून कसें सांगितलें याबद्दल सर्वांसच आश्चर्य वाटलें.

आमची कुलस्वामिनी कोल्हापूरची महालक्ष्मी. परंतु आमच्या घरांत पूर्विपासून एक शालिग्राम आहे. त्यास आम्ही स्वामी म्हणतों. दररोज या स्वामींची व महालक्ष्मीच्या रौप्यसुवर्णप्रतिमेची आमच्या घरीं पूजा होते. या स्वामींच्या प्ररणेनें माझ्या बंधूंनीं सूनबाईस शिरडीस घेऊन जाण्यास सांगितलें व वैद्यांच्या घरीं अंगांत आलेल्या महालक्ष्मीनेंही सूनबाईस शिरडीसच घेऊन जाण्यास सांगितलें. तेव्हां शिर्डीस जाऊन बाबांची सेवा केल्यावांचून सुनबाईचें दुखणें बरें होणार नाहीं अशी सर्वांनाच खात्री वाटूं लागली.

माझी पहिल्यापासूनच अशी दृढ भावना होती कीं सूनबाईनें नित्य नेमानें उदीसेवन, श्रीसाईसच्चरितवाचन, बाबांच्या समाधीस प्रदक्षिणा व बाबांच्या अंघ्रिकमलावर तुलसीपत्र, याप्रमाणें सेवा करावी म्हणजे तिच्या दुखण्याचा परिहार होईल. पण हें माझें मत सर्वस्वी जरी चि. सौ. उमाबाईस पटलें होतें व तिची या गोष्टीवर पूर्ण निष्ठाही होती, तरी घरांतील इतर मंडळी व डॉक्टर व वैद्य यांचा भर अद्यापही अंतःक्षेपणावर व औषधावरच होता. सूनबाईची शिर्डीस येण्याची दोन वेळां तयारी होती. पण घरांतील मंडळींची अनुकूलता नव्हती व डॉक्टरही परवानगी देईनात. हवापालट करणें हा तर क्षयरोगावर (T. B.) रामबाण उपाय समजला जातो; तथापि जितकें भोक्तृत्व असेल, तितकें भोगल्याशिवाय या उपायाकडे तरी सर्वांची दृष्टि फिरणार कशी ?

शेवटीं कांहीं माझे बंधूंनीं लिहिण्याचा, कांहीं श्रीमहालक्ष्मींनीं सांगितल्याचा परिणाम आमच्या घरांतील मंडळीवर झाला. किंवा श्रीसाईपरमात्म्यासच सूनबाईची दशा पाहवेना. तो डॉक्टर-वैद्यांचे खेळ पाहत होता. त्यालाच कींव आली. त्यानेंच सर्वांच्या अंतःकरणांत मनोवेगाची, वायुवेगाची, विद्युद्वेगाची, प्रेरणा केली व शिर्डीस जाण्याचें ठरलें. माझ्या वडील भगिनी

ती. आऊताई ह्यांनीं पूर्वीच कबूल केलें होतें कीं, चि. सौ. उमास शिर्डीस घेऊन जाण्याचें ठरलें, तर मी शिर्डीस येईन. त्याप्रमाणें त्यांना पत्र घातलें. त्या ठाण्यास आल्या व मी, चि. सौ. उमाबाई व ती. आऊताई अशीं तिघेंजण मिति माघ कृ. ७ मंगळवार शके १८५५ ता. ६ फेब्रुवारी १९३४ रोजीं सायंकाळच्या नाशिकच्या गाडीनें ठाण्याहून ७ वाजतां निघालों.

निघालों. पण निघालों कोठें ? श्रीसीतापति प्रभु रामचंद्राच्या अयोध्यापुरीकडे ? श्रीराधारमण प्रभु कृष्ण परमात्म्यांनीं वध केलेल्या कंसाच्या मथुरापुरीकडे ! श्रीरमा-उमाधव प्रभु बदिनारायण बदिकेदार पदस्थित गंगाद्वार पुरीकडे ? श्रीगौरीनाथ प्रभु विश्वेश्वराच्या काशीपुरीकडे ? श्रीइंदिरा-गिरिजा वल्लभांच्या शिवकांची विष्णुकांची पुरीकडे ? श्रीअपर्णेश प्रभु महाकालाच्या अवंतीपुरीकडे ? श्रीसत्यभामाकांत प्रभु गोपालकृष्णाच्या द्वारकापुरीकडे ? किंवा श्रीरुक्मिणीरंग प्रभु पांडुरंगाच्या पंढरीनगरीकडे ? छे, छे, नव्हे, नव्हे, तर हे अष्टप्रभु ज्या एकाच प्रभुचूडामणीच्या ठिकाणीं लीन होतात, व ह्या अष्टपुऱ्या ज्या एकाच नगरींत एकवटतात, त्या जगज्जननी श्रीसाईमाउलीच्या शिरडी नगरीकडे !

तिसऱ्या मजल्यावरील खालींतील मंचकावरचा बिछाना जवळ जवळ जिनें आठ महिने सोडला नाहीं, जिनें दोन लघु रामपात्रें दूध व दोन घास भाताच्या शितांपेक्षां पैभारही जास्त आहार घेतला नाहीं, तिला एकदम वाष्पवेगानें धांवणाऱ्या अग्निरथांतील अंगाला झोंबणारा थंड वारा सोसेल काय ? कोणत्याही प्रकारचा अपाय न होतां ही शिरडीराजाच्या नगरींत जाऊन पोंचेल काय ? अशा व अशाच प्रकारच्या इतर कल्पनांनीं मनांत रणधुमाळी करण्यास सुरवात केली. प्रभूची लीला विचित्र ! कासाऱ्याचा घाट चढल्याबरोबर सर्वच वातावरण बदललें. प्रत्येकाच्या अंतःकरणांतील कल्पनातरंगास अनुकूल दिशा मिळाली. चि. सौ. उमाबाईस अंगास झोंबणाऱ्या वातलहरी मंद, शीतल व आल्हादकारक अशा वाटूं लागल्या. आम्हांस तेथून मंदिर दिसूं लागलें. कळस दिसूं लागला. श्रीद्वारकामाईंतील

बाबांची भव्य व मंदस्मितवदनछबी दिसूं लागली. आनंदोर्मि उचंबळूं लागल्या. इतक्यांत पर्जन्यराजही त्या शिरडींतील श्रीद्वारकामाईशाच्या पदकमलावर अर्पण करण्याकरतां कांहीं तुषाररूप पुष्पांजलि आमच्याजवळ देऊन परत फिरले. नऊ वाजण्याचा सुमार होता. श्रीमहाशिवरात्र नजीक आली होती. थंडी म्हणजे मी म्हणत होती. आम्ही कपड्यांची भरपूर तयारी करून घेतली होती. सूनबाईच्या सांगण्यावरून डब्याच्या खिडक्या उघड्याच ठेविल्या होत्या. तिची हुषारी कांहीं विलक्षणच दिसली.

मुंबापुरीस तिच्या माहेरीं तळमजल्याची आकुंचित जागा किंवा आमची ठाणें येथील तिसऱ्या मजल्यावरील जागा यांत सदागति असणाऱ्या जगत्प्राण प्रभंजनाला स्वैरवृत्तीनें वागडण्यास अवकाश कसा मिळणार ? आमचा अग्निरथ जनस्थान ( नाशिक ) स्टेशन जवळ जवळ जाऊं लागला. वातलहरी असह्य होऊं लागल्या. थंडीनें उग्र स्वरूप प्रगट केलें. डब्याचीं दारें लावून आम्हीं सर्वजण यथास्थित पांघरुणें घेऊन निजलों. मनमाड आलें. सुमारें रात्रीचे दोन वाजतां आम्ही उतरलों. कोपरगांवचे अग्निरथाचे डबे उघडून मिळण्याची वाट पाहत दगडाची लादी बसविलेल्या थंड चबुतऱ्यावर ( प्लॅटफार्मवर ) थंडीनें कुडकुडत कांहीं वेळ बसलों. बाबांचे भक्त श्री. पर्वतीबोवा हमालांचा शोध केला. ते आले. त्यांनीं सूनबाईकरितां शर्करामिश्रित उत्तम तापविलेलें खर्पूस व गरमागरम दूध आणून दिलें व डबा उघडून देऊन आमची सर्वांची आंत निवाऱ्याच्या व बिनथंडिच्या जागेंत बसण्याची सोय करून दिली. इतक्या थंडीच्या कडाक्यांतही चि. सौ. उमाबाईस बरेंच वाटत होतें.

" प्रसाद चिन्हानि पुरःफलानि " या गीर्वाण कविवर्य कालिदासोक्तिप्रमाणें आम्हासही सर्व भावी उत्तम फल मिळण्याचीं प्रसादचिन्हेंच वाटूं लागलीं. ४–४५ ला आमचा अग्निरथ मनमाडपासून हलला व सुमारें ६ वाजतां आम्ही कोपरगांव स्टेशनवर आलों. स्वतंत्र टांगा करून पंचगंगेच उषःकालांत निघून सुमारें सात सवासातचे सुमारास बुधवार उजाडतां

श्रीसाईपुण्यनगरींत येऊन थडकलों. थंडीमुळें माझे हातपाय आखडून गेले. मला तांग्यातून खालीं उतरवेना. कष्टानें उतरलों. ती. आऊताई कष्टानेंच उतरल्या. सूनबाई मात्र चटकन् उतरली.

तेथें गेल्यावर कै. भक्तश्रेष्ठ काकासाहेब दीक्षितांच्या वाड्यांत एका खोलींत आम्ही आपलें बिऱ्हाड ठेविलें. चि. सौ. उमाबाई जसें सांगेल त्याप्रमाणें व काय मागेल तें तिला आणून देत जावें असें मीं ती. आऊताईंना सांगितलें. त्याप्रमाणें त्यांनीं सर्व व्यवस्था बरोबर ठेविली. तेथें गेल्यापासून औषध, पथ्य, बंद. दररोज सकाळीं दूध, लाडू, तर कधीं कधीं दूध बदाम. कधीं कधीं दूध-खारीक किंवा खजूर-तूप. दुपारीं जेवण भात, गव्हांची पोळी, केळ्यांची शिकरण, तर कधीं कधीं बाजरी-जोंधळ्यांची भाकरी. पण सुनबाई फार करून पोळीच खाई. तिला पोळीबरोबर शिकरणही आवडे. पण तिला कधींही पोळी शिकरण बाधली नाहीं. तिचें पोट दुखलें नाहीं; कारणही उघडच आहे. भक्तश्रेष्ठ तात्याबा पाटील यांच्या शेतांतील उत्तम गव्हांची पोळी व बाबांच्या बागेंतील गोड केळ्यांची शिकरण! ती बाधणार कशी? उलट ती तुष्टिपुष्टीच आणणार. असो. मागले भातावर दूध किंवा दहीं घेई. तिसरे प्रहरीं कधीं मुसंबीं, कधीं ऊंस, कधीं चिकू, कधीं द्राक्षें तर कधीं काकड्या व पेरू. पेरू तर जवळजवळ एक महिनाभर तिनें नुसते व लोणचें करून खाल्ले. ज्या दिवशीं येतील, त्या दिवशीं ताजे मोठे एक किंवा दोन खावयाचे, व दुसऱ्या तिसऱ्या दिवशीं त्यांचें लोणचें किंवा रायतें करून खावयाचें. कोपरगांव नजीक पेरूच्या बागा पुष्कळ आहेत व त्यांत पेरूही नामांकित मोठे व गोड असतात हें सुप्रसिद्धच आहे. रात्रीं दूध, उंसाचा रस, लाडू, बाबांच्या बागेंतील पोपई किंवा शिकरण-पोळी. तिला रात्रीं भात खाण्याचा कंटाळा येई. पोपई ती फार खात नसे.

आम्ही शिर्डीस गेलों तेव्हां चि. सौ. उमाबाई ही सहा महिन्याची गरोदर होती. डॉक्टर व वैद्य म्हणत कीं, क्षयरोगांत गरोदरपण हें फार

ाशे हातपाय आखडून गेले.
ती. आऊताई कष्टानेंच

वाईट. कबूल. पण तें सुदैवानें अगर दुर्दैवानें आलेंच तर करणार काय ! असो. अशा स्थितींत तिला वाटेल तितके पेरू खाण्यास देणें चांगलें का ! नसेल. पण बाबांचीच इच्छा तिनें पेरू खावे व तिचा रोग समूळ जावा अशीच असेल तर ! नाहीं तर वर लिहिलेल्या सर्व फळांपेक्षां तिला पेरूच कां जास्त आवडावे व पेरूंवरच तिची जास्त इच्छा कां जावी ? प्रथमप्रथम ती. आऊताई मला रागें भरत कीं, सुनबाई आजारी व गरोदर. अशा स्थितींत तुम्ही तिला लागतील तितके पेरू खावयास देतां हें चांगलें काय ! तिला पेरू बाधतील व नसतें आणखी एक तिसरेंच लचांड उत्पन्न होईल. मला वाटे कीं बाबांनीं भुइमुगाचे दाणें खावयास सांगून श्री. काकामहाजनींची जुलाबपीडा नाहींशी केली. अक्रोड-पिस्ते खावयास सांगून श्रीमंत कै. बापूसाहेब बुटींची महामारी नाहींशी केली. काळ्या कुत्र्यास दहीभात घालावयास सांगून श्री. बाळ शिंप्याच्या हिमज्वराचा नाश केला. ( श्रीसाई-सच्चरित अ. १३ पाहा. ) त्याचप्रमाणें एकाच दिवस मिष्ट, स्वादिष्ट, रुचकर, अशी बर्फी व साखर खावयास देऊन कै. भक्तवर्य नानासाहेब चांदोरकरांची दोन वर्षांची पोटदुखी घालविली. तर चि. सौ. उमाबाईचें दुखणेंही बाबा तिला पेरू खावयास लावून कां बरें करणार नाहींत, असें मी आऊताईंना म्हणें. शिवाय मी सकाळीं स्नान करून नित्याप्रमाणें बाबांच्या समाधीजवळ उपासना करण्यास बसलों होतों. इतक्यांत उमा स्नान करून बाबांच्या समाधीजवळ त्याच वेळीं वातींचा लक्ष लावण्याकरतां तेथें आली. दररोज पांच पांच हजार वाती लावून वीस दिवसांत लक्ष पुरा करावयाचा असा तिचा संकल्प होता. उमा बाबांच्या समाधीच्या चवुतऱ्यावर असलेल्या नंदादीपावर वाती पेटवीत होती. इतक्यांत मीं तिला सहज विचारलें, " उमा, तुला काय खावेंसें वाटतें ?" ती म्हणाली "येथें पेरू मिळतात ना ?" मीं म्हटलें, "होय, येथें पेरू चांगले मिळतात." ती पुढें कांहींच बोलली नाहीं. मीं तर्क बांधला कीं हिला पेरू खाण्याची इच्छा झाली आहे व ज्या अर्थी हा पेरूचा विषय

बावांच्या समाधीवर त्यांच्याच पायाजवळ निघाला आहे, त्या अर्थी तिला पेरू खाण्याची त्यांनींच प्रेरणा केली व तिच्या पेरू खाण्यांतच तिच्या दुखण्याचा नाश आहे. म्हणून बाबांची आज्ञा समजूनच तिला आपण पेरू आणून दिले पाहिजेत असें मीं आऊताईंना सांगितलें व त्याप्रमाणें त्याच दिवसापासून कोणत्याही प्रकारची शंका मनांत न बाळगतां मी तिला पेरू आणून देण्याची व्यवस्था केली. तेव्हांपासून ती लागतील तितके इच्छेस येईल त्या वेळीं मनमुराद पेरू खाई. चमत्कार असा कीं, बाबांच्या पूर्ण कृपेनें तिला पेरू कधींही बाधले तर नाहींतच, पण त्याच्याचपासून तिचें दुखणें कायमचें जाऊन तिची शक्ति दिवसेंदिवस वाढत चालली. पेरू स्वस्त, तीन दिडक्या शेर व बाबा धन्वंतरी.

बाबांच्या मंदिरांत ती दिवसांतून चारपांच खेपा करी. श्रीद्वारकामाईंत जाऊन बाबांच्या छबीचें दर्शन करून येई. बाबांच्या समाधीस १२ पासून २८ पर्यंत रोज प्रदक्षिणा घाली. श्री. नवलकर-साहेबांच्या वाड्यांतील निंबवृक्षास व खालीं असलेल्या बाबांच्या पादुकांस प्रदक्षिणा घाली व दुपारची आरति झाल्यावर जेवावयास येई. जेवण झाल्यावर श्रीसाईसच्चरिताचे एक किंवा दोन अध्याय वाची. नंतर थोडी वामकुक्षी करी किंवा कधीं कधीं बारिकसारिक कामही करावयास लागे. नंतर कधीं बाबांच्या बागेंत किंवा कधीं चारीवर ( श्रीगोदा-माईच्या पाटावर ) व कधीं कधीं त्याच्याही पुढें सहल करावयास जाई. सायंकाळच्या आरतीस मंदिरांत जाई व तिकडून आली, कीं काय खावयाचें तें खाऊन श्रीरामायण किंवा अशाच प्रकारचे ग्रंथ वाचून रात्रीं सुमारें ९–१० वाजतां निद्रावश होई. तिच्याकरितां आमच्या आऊताई कधीं कधीं रव्याचे लाडू, तर कधीं कधीं बुंदीचे लाडू करून ठेवीत. तिच्या सासूबाईंनीं तिच्याकरितां डिंकाचे लाडू करून बरोबर दिले होते. उमाबाई कधीं रव्याचा तर कधीं बुंदीचा व कधीं डिंकाचा याप्रमाणें तिच्या मर्जीस वाटेल तो लाडू खाई. आम्ही तेथें तूप-दूध सडकून घेत असूं. उत्तम दूध चार

आणे शेर; पण तिथला शेर म्हणजे ठाण्याचे दोन शेर. तसेंच ताजें लो कढें तूप कधीं रुपयास शेर, तर कधीं एक रुपया एक आण्यापासून स रुपया शेरपर्यंत मिळे व शेर पक्का म्हणजे ८० तोळ्यांचा. ठाण्या शेरापेक्षां अडीच पटीनें मोठा असून वर १० तोळे जास्त.

बाबांच्यासंबंधानें जेवढें करावयाचें तेवढें उमाबाई निष्ठेनें व नेमा करी. तिचें दुखणें बरें व्हावें म्हणून माझ्या कुटुंबानें सोळासोमवार करण्यास मार्गशीर्ष शु. ३ सोमवार शके १८५५ पासून ( ता. २० डिसें- बर १९३३ पासून ) प्रारंभ केला व १७ वा सोमवार शिरडीस बाबांच्या चरणाजवळ करावयाचा असें ठरवलें. त्याप्रमाणें ठाण्याची सर्व मंडळी ता. ९ मार्च १९३४ शुक्रवार रोजीं म्हणजे १७ व्या सोमवाराचे अगोदर ती दिवस शिरडीस हजर झाली. सोमवारीं म्हणजे ता. १२-३-३४ रोजीं एकादशी असल्यामुळें त्या दिवशीं फक्त सायंकाळीं शंकराच्या मंदिरांत स एकादशिनीपूर्वक षोडशोपचार पूजा, चुर्म्याच्या एकतृतीयांश लाडवांचा शंकरास नैवेद्य, एकतृतियांश लाडू शंकराच्या देवळांत समर्पण, बाबांच्या समाधीजवळ चि. रा. बाबूरावाचें श्रीगुरुचरित्रपारायण, समाधीवर तांबडें जरीकाठी व हिरवें रेशिमकांठी अशा दोन महावस्त्रांचें समर्पण, सोळा सोमवाराची कथाश्रवण, श्रीज्ञानेश्वरी पुराणश्रवण व रात्रीं संस्थान-गवयांचें कीर्तन, इतकें झालें.

नंतर दुसऱ्या दिवशीं म्हणजे,ता. १३-३-३४ रोजीं सोळा सोम- वारनिमित्त व वाती लावण्यानिमित्त एकंदर अठरा दंपत्यें, ब्राह्मण, सुवासिनी, मुलेंबाळें, सर्व संस्थानसेवक, श्री. तात्याबा पाटील, बयाजी पाटील, रघू पाटील वगैरे मराठी मंडळी, भजनी मंडळी व इतर अनाथ मंडळी मिळून दीड पान झालें. भोजनास सोळा सोमवाराच्या प्रसादाचे शिल्लक राहिलेले एक- तृतीयांश चुर्म्याचे लाडू, शिवाय रव्याचे लाडू केले होते. आचाऱ्याच्या अभावामुळें चुर्म्याचे व रव्याचे लाडूसह सर्व स्वयंपाक आमच्या आउ-

ईनींच केला. स्वयंपाक श्रीच्या मंदिरांत केला. खालीं व वर भोजनाची पानें बसलीं होतीं. त्या दिवशीं प्रदोष असल्यामुळें बरीच स्त्रीपुरुष व दंपत्य-मंडळी रात्रीं भोजनास आली होती. एकंदर व्रतसमाप्तीचा थाट श्रीचरणा-जवळ श्रीमंदिरांत झाल्यामुळें त्यास एक प्रकारें विशेष अपूर्वत्व आलें होतें.

नंतर ता. १५–३–३४ रोजीं तिसऱ्या प्रहरीं बाबांच्या बागेंत चि. सौ. उमाबाईचें चहाचिवड्याचें डोहाळजेवण झालें. या समारंभास ठाण्याहून सोळा सोमवाराकरतां आलेली भाग्यकामंडळी म्हणजे माझी दुसरी सूनबाई चि. सौ. कमलाबाई, तिची चिमुकली कन्या चि. मीनाक्षी उर्फ मन्या, माझें कुटुंब, व संगमनेराहून आलेली माझी तिसरी सूनबाई ( माझ्या पुतण्याचें कुटुंब ) चि. सौ. रमाबाई व तिच्या तिघी मुली व दोन मुलगे अशी मंडळी हजर होती. बाबांच्या उद्यानांतील गगनचुंबित वनदाट वाढलेल्या रम्य रंभाकाननाच्या दुतर्फा रांगांतील राहिलेल्या आकुंचित पण प्रशस्त प्रेक्षणीय जागेंत निरनिराळ्या रंगाच्या लांबचलांब बिछायती घातल्या होत्या व त्यावर सुंदर सुंदर अंगोतलीचीं लहानलहान केळीचीं पानें मांडलीं होतीं. डोहाळमुलीस बसण्याकरतां उच्चासन म्हणून तेथेंच केळीच्या झाडाखालीं जाड लाकडांचे उंच खुंट पुरून त्याला झोंपाळा टांगला होता. त्यावर बिछाईत घालून रमणीय रंगीबेरंगी गालिचा पसरला होता. इतकें करतांकरतां श्रीदिनराज सूर्यनारायण घाईघाईनें अस्ता-चलावर जाण्यास निघाले. मग किटसन प्रकाशाचे मोठे तीनचार दिवे लावले. गांवांतील, परगांवातील व घरांतील व संस्थान-नोकरमंडळीच्या स्त्रिया व मुलें डोहाळमुलीच्या पंक्तींत बसली होती. तिच्या वेणींत बाबांच्याच बागेंतील सुवासिक व शोभिवंत फुलांचे गजरे व वेण्या घातल्या होत्या. केळीच्या दुतर्फा दोनतीन रांगा भरल्या होत्या. चिवडा खाण्यास व चहा-पानास इच्छेनुरूप सुरवात झाली. कांहींकांहीं स्त्रियांनी व मुलींनीं कर्ण-मनोहर अशा मंजुल सुस्वरांत संगीत डोहाळे म्हणण्यास सुरवात केली.

कांहीं हास्यरसांत तर कांहीं आपआपसांत चाललेल्या प्रसंगानुरूप अ[illegible] विनोदात्मक मर्यादित थट्टामस्करीत प्रफुल्लित अंतःकरणानें भाग घेत होत[illegible] कांहींकांहीं पतिराजांचें नांव घेण्याकरितां एकमेकींस प्रेमाचा आग्रह क[illegible]ण्यांत चूर झाली होती.

इकडे याप्रमाणें स्त्रीसमाजांत विनोदहास्यानंदाची गर्दी उडून गे[illegible] असतां दुसरीकडे त्याच बागेंत भव्य दीपप्रकाशांत रंभा व मित्र छाय[illegible]च्छादित बाबांच्या दीपकस्थानासन्निध मोकळ्या पटांगणांत जाजमें व स[illegible] रंजा पसरल्या होत्या; त्यांवर बसून गावांतील बहुतेक सर्व जातीची [illegible] संस्थान-नोकर-पुरुषमंडळी विनोदात्मक हास्यानंदरसांत चिवडा, भोजन[illegible] चहापान, तमाखुपान, तांबूलग्रहण करण्यांत दंग झाली होती. कित्येक[illegible] दंतभग्न मंडळी चिवडा व विडा खलबत्त्यांत कुटून खाण्यांत गुंतलेली होत[illegible]

एकंदर स्त्री-पुरुष-बालगोपाल मिळून १५०–२०० पात्र झाले [illegible] समारंभ ३–४ तास चालला होता. सुरवात ४ वाजता होऊन ८ वाजत[illegible] समारंभसमाप्ति होऊन मंडळी आनंदांत आपापल्या घरोघर गेली. समारंभास बाबांच्या बागेमुळें, हास्यविनोदात्मक शानंदीआनंदामुळें स[illegible] मंडळीच्या प्रेमसाहाय्यामुळें, दिनराजाच्या मंद अतएव आल्हादकारक सप्तवर्णमिश्रित तेजामुळें व किटसनदीपांच्या उज्ज्वल प्रकाशामुळें अभूत, अश्रुत, व अपूर्व अशी शोभा आली होती.

नंतर दुसऱ्याच दिवशीं म्हणजे ता. १६–३–३४ रोजीं कै. भक्त-राज काकासाहेब दीक्षितांच्या वाड्यांत तळमजल्यावर पुढील भव्य दर्शनी ओटीवर रात्रीं चि. सौ. उमाच्या चांदण्याच्या डोहाळेजेवणाचा समारंभ झाला. सर्व मिळून ३०–४० बायका भोजनास होत्या. रजनिनाथाच्या कृपेमुळें सर्व ओटी चंद्रिकामय झाली होती. केळीचीं पानें मांडून रंगवल्ल्या काढल्या होत्या. करंज्या, चिरोटे, लाडू वगैरे पक्वान्नादि खाद्य वस्तूंनीं पानें सुशो-भित केलीं होतीं. मधूनमधून उदबत्त्यांच्या परिमळानेंही गर्दी करून सोडली

होती. मृदु, मधुर, मंजुळ आलापांत मधूनमधून श्रुतिसुभग अशा सुस्वरांत डोहळयांच्या गाण्यांचा दीर्घोच्च ध्वनि ऐकूं येत होता. विनोदहास्यानंदांत पतिराजांचें नांव घेण्याचा प्रेमाग्रह या समारंभांतही परस्परांत जेवतांजेवतां चालू होता. एकंदरींत हाही समारंभ शिरडी राजसंत चक्रवर्तीच्या कृपेनें उत्तम व समाधानकारक झाला.

नंतर चैत्र शु. ३ रोजीं कै. काकासाहेब दीक्षितांच्या वाड्यांत हळदीकुंकू झालें. हा समारंभ फार मोठा झाला नाहीं. येतांजातांचाच झाला. हळदीकुंकू आटोपून माझें कुटुंब ठाण्यास परत गेलें. नंतर लागलीच चि. सौ. उमाबाई, चि. सौ. कमलाबाई, चि. कु. मालतीबाई, सुशीलाबाई, कुसुमबाई, चि. रंगू, शरद, वगैरे मंडळी श्री. रघुवीर पुरंदरे यांच्याबरोबर संगमनेरास गेली. पुरंदरे त्याच रात्रीं परत आले. ता. ३–४–३४ रोजीं मी संगमनेरास गेलों व मी, चि. सौ.उमाबाई व चि. सौ.कमलाबाई व आमचा छोटेखान मन्या अशी मंडळी ता. ८–४–३४ ला परत शिरडीस आलों. दुसऱ्या दिवशीं शिरडीस राहून चि. सौ. उमाबाईस नववा महिना लागून गेला असल्यामुळें आम्ही सर्व ता. १०-४-३४ रोजीं ठाण्यास परत गेलों.

आम्ही ठाण्याहून शिरडीस आलों, तेव्हा उमाचें वजन ९४ पौंड होतें. तेथें गेल्यावर दर पंधरा दिवसांनीं आम्ही तिचें वजन घेत असूं. तिचें वजन झपाट्यानें वाढत होतें. आम्ही दोन महिन्यांनीं ठाण्यास परत जाण्यास निघालों, त्याच्या अगले दिवशीं म्हणजे चवथ्या पंधरवड्याच्या शेवटीं वजन घेतां तिचें वजन बरोबर ११० पौंड भरलें. आठ महिन्यांच्या पूर्ण वाढीच्या गर्भाचें वजन ७ पौंड वरील ११० पौंडातून वजा केलें, तरी दोन महिन्यांत तिचें ९ पौंड वजन वाढलें हें उघड आहे. इतक्या अवधींत इतकें वजन वाढणें ही अगम्य व अतर्क्य लीला नव्हे का ? पण यांत आश्चर्य व नवल तरी कसलें ? जेथें साईपरमात्मा हे सद्वैद्य, साईमंदिरतीर्थ वापीचें जान्हवी तोय हें औषध, साईबागेंतील पोपया, केळीं, श्रीगोदावरीमाईचे तट-

प्रांतांत असणाऱ्या बागेंतील मधुर, रुचकर पेरू व मन मानेल ती इतर फळफळावळ व सात्त्विक आहार, व साईनगरांच्या आसमंतभागांतील मोकळी; भरपूर व शुद्ध हवा हें पथ्य, निरनिराळ्या प्रकारें एकनिष्ठेनें व प्रसन्न मनानें केलेली सेवा हें तप, मारक तेंच तारक, गरल तेंच अमृत, वाळूकण तींच रत्नें. त्या ठिकाणीं टी. बी.ची कथा काय ? ज्या ठिकाणीं भवरोग सबीज, समूळ, सहकुटुंब नाहींसा होतो, त्या ठिकाणीं टी. बी. कसा राहील ?

असो. गुरुगौरववर्णन करण्याचें सामर्थ्य कोणाजवळ आहे ? सद्गुरूंना मौनानेंच भजावें तें चांगलें.

आम्ही ठाण्यास आल्यानंतर सुमारें दहाअकरा दिवसांनीं चि. सौ. उमाबाई मुंबइस माहेरीं गेली. आम्ही शिरडीस असतांनाच तिच्या वडिलांचें पत्र आलें होतें कीं ती पहिलटकरीण आहे, करितां तिचें बाळंतपण आमच्या घरीं व्हावें अशी आमची इच्छा आहे. आम्ही त्यांच्या म्हणण्यास कष्टानेंच रुकार दिला. कारण ते उमाचें बाळंतपण घरीं करणार नव्हते. बाळंतपणाकरितां ते तिला कोणत्या तरी सूतिकागृहांत पाठविणार होते. त्यांनीं आम्हांस दोनतीन सूतिकासदनांचीं नांवें कळविलीं होतीं. आम्ही जुन्या पद्धतीचे म्हणा कीं काय वाटेल तें म्हणा, पण उमाचें बाळंतपण घरीं व्हावें व त्यांतूनही आमच्याच घरीं व आमच्याच देखरेखेखालीं व्हावें असें मला पहिल्यापासून वाटत होतें. तें कां कोण जाणें! पण ज्या अर्थी तिच्या वडील मातुःश्रींची इच्छा तिचें बाळंतपण त्यांच्या तेथें व्हावें अशी होती, त्या अर्थी आम्ही तरी त्यांच्या इच्छेच्या आड काय म्हणून यावें ? आमच्यापेक्षांही त्यांना जास्त काळजी. त्यांच्याकडे त्यांच्या इतर मुलींचीं आजपर्यंत कितीतरी बाळंतपणें झालीं. ह्या सर्व गोष्टी यद्यपि खऱ्या; तथापि उमाचें बाळंतपण आमच्याच घरीं व्हावें असें मला वाटे खरें.

चि. सौ. उमाबाई माहेरीं गेल्यावर थोडयाच दिवसांनीं तिच्या वडि-लांना मधुमेहाच्या गळवावर शस्त्रक्रिया करण्याकरतां रुग्णालयांत नेणें भाग पडलें. कांहीं दिवसांनीं पुन्हा दुसऱ्या रुग्णालयांत न्यावें लागलें. उमास सूतिकागृहांत पाठविण्याचें कांहीं कारणामुळें जुळेना. तिचें बाळंतपण त्याच्या चिन्हाडींच करण्याचें ठरलें.

चमत्कार असा झाला कीं, बाळंतपणाकरतां मला ठाण्यासच पोंचवा असा उभानें ता. २३ मे रोजीं रात्रीं म्हणजे ९ महिने १० दिवस पुरे झाल्यावर हट्ट घेतला. आम्ही सर्व तयारी केली आहे, तूं आजउद्यां बाळंतीण होशील, तरी तूं येथेंच राहा, असा प्रेमाग्रह तिच्या घरच्या सर्व मंडळींनीं तिला केला. परंतु ती कांहीं केल्या ऐकेना. सरतेशेवटीं निरुपाय म्हणून तिला दुसऱ्या दिवशीं म्हणजे ता. २४ मे रोजीं तिच्या ज्येष्ठ भगि-नीचे यजमान श्री. रा. दादासाहेब पाध्ये यांच्याबरोबर तिच्या मातुश्रींनीं सकाळीं साडेदहा-अकराच्या सुमारास ठाण्यास आमच्या बिऱ्हाडीं पोंचती केली.

त्या दिवशीं मी तापानें फार आजारी होतों. मला आमच्या शेजाऱ्यांच्या वहिनींनीं सांगितलें कीं, तुमची सूनबाई आली. मला तें खरेंच वाटेना. मीं म्हटलें ही गोष्ट अशक्य. त्या म्हणाल्या, खरोखरच आली आहे. इतक्यांत प्रत्यक्ष सूनबाईच मला नमस्कार करण्याकरितां बाबांच्या खोलींत आली. तिनें मला नमस्कार केला. मीं विचारलें, "उमा, तूं या वेळेस येथें कशी आलीस?" ती म्हणाली, "आले." व चटकन् ती आपल्या खोलींत निघून गेली. नंतर लाग-लीच दादासाहेब पाध्ये माझ्या खोलींत आले व मजजवळ पंचवीस मिनिटें बोलून परत मुंबईस निघून गेले. ते ठाण्याच्या स्टेशनवर पोंचले असतील-नसतील, इतक्यांत म्हणजे अर्ध्या तासाच्या आंत बरोबर १२ वाजतां उमाबाई कोणत्याही प्रकारचे कष्ट किंवा यातना न होतां बाबांच्या पूर्ण कृपेनें सुख-रूप बाळंतीण झाली. तिचें पोटही दुखलें नाहीं. ज्याप्रमाणें एखाद्या

मनुष्याजवळ ठेवलेली अनामत ठेव त्यानें नेमल्या मुदतीस विनबोभाट आपल्यास आणून द्यावी त्याप्रमाणें उमाबाईच्या उदरांतून गर्भठेवीचें गाठोडें एकदम बाहेर येऊन पडलें. जवळ फक्त माझें कुटुंब होतें. दुसरें कोणीही नव्हतें. आमची तारांबळ उडाली. मग सर्व कांहीं व्यवस्थित झालें. मुलगा झाला.

श्री. दादासाहेब पाध्ये एक गाडी उशीरा आले असते, किंवा त्यांची एक गाडी चुकली असती, म्हणजे गाडींत केवढा दुर्धर प्रसंग आला असता ! परंतु साईमाऊलीस कोणाची फजिती करावयाची नव्हती. फक्त आपल्या कलेचें अतुल सामर्थ्य दाखवावयाचें होतें. जिच्या गरोदरपणास पुरे २८० दिवस झाले होते, अशा अत्यंत नाजुक व जबाबदारीच्या स्थितींत तिनें मुंबईहून निघून ठाण्याच्या स्टेशनवरील दोन दादरांची, तसेंच ठाणे येथील आमच्या बिऱ्हाडाच्या तीन मजल्यांची चढउतर केली कशी ? ठाण्यासच मी बाळंतीण होणार. तेथेंच मी जाणार. केवढा हा आत्मविश्वास ! परंतु हा आत्मविश्वास आणिला कोणी ? अकराव्या तासाला ही जोराची प्रेरणा केली कोणी ? व कशाकरतां ? उमानें एवढा जो हट्ट धरला व एवढें जें साहस केलें, तें कोणाच्या जोरावर ?

"आधणीं घातलिया हरळ । होती अमृताचे तांदुळ ।
जरी भुकेची राखे वेळ । श्रीजगन्नाथु ॥ २३ ॥

श्री. ज्ञा. अ. १५, प्रस्तावना

या श्रीभगवान् ज्ञानेश्वरमाऊलींच्या अमोल उक्तीप्रमाणें श्रीसाईजगन्नाथाला उमाबाईच्या रोगोद्भवाच्या पहिल्या दिवसापासून ती बाळंतीण होईपर्यंत तिच्या आत्मविश्वासाची व साहसाची वेळ राखावयाची होती, म्हणून तिनें पेरु खाण्याचें व ठाण्यास येण्याचें साहस केलें ! ही काय साईजगदंबेची लीला कीं पोरखेळ ! तिची प्रकृति हल्लीं उत्तम आहे.

औषधावांचून इतक्या गोष्टी सुरक्षितपणें होणें, याला आमचे अधुनिक सुधारलेल्या भौतिक शास्त्राच्या चष्म्यानें पाहणारे वैद्य व डॉक्टर काय म्हणतील? निसर्ग, काकतालीय न्याय, किंवा पूर्वी घेतलेल्या वैद्य डाक्टरांच्या औषधांचें व अंत:क्षेपणाचें संकलित फल म्हणून गर्जना करतील. करोत बापडे. मी तर संतवचनावर विश्वास ठेवून बाबांची कृपा म्हणून म्हणणार. इति शम्. संपादकमहाशय महाराज, फारच लांबलेला लेख पुरा करून आपली रजा घेतों.

मिति ज्येष्ठ शु. १०
गुरुवार शके १८५६
ता. २४–५–३४, ठाणें

संतपदरज दासानुदास
बाबांचें बाळ

श्रीसाईलीलेच्या अनुक्रमणिकेंतील स्फुट विषय यी सदरापैकीं पृष्ठें ९३८(जोड अंक ११-१२ वर्ष ८, पौष-माघ, शके १८८३) आणि ९३९ (वर्ष ११, अंक ७, भाद्रपद, शके १८५६) ह्या दोहोंमध्यें घालावयाचा चुकून राहिलेला मजकूर:—

**विवरण**:—सकल भक्तिशास्त्राचें मननपूर्वक श्रवण करावें. ह्या शास्त्रकर्त्या आचार्यांचीं नामें पुढील सूत्र ८३ ह्यांत दिलीं आहेत. त्यांच्या शास्त्रानुसार भक्त्युद्भव व भक्तिवृद्धि करणारीं जीं जीं कर्मे असतील, त्यांशिवाय इतर सकल कर्मे मुमुक्षूंना सर्वथैव वर्ज्य होत, हें पक्कें लक्षांत ठेवावें.

**सूत्र ७७ ॥ सुखदु:खेच्छालाभालाभादित्यक्त काले प्रतीक्षमाणे क्षणार्धमपिव्यर्थं न नेयम्. ॥**

**आर्या**:—॥ जाणोनी कालाची निष्ठुरता तीव्र सर्वदा सकलां ॥
॥ साई–भजनानंदीं राहे सद्भक्त सर्वकाल सदा ॥

**विवरण**:—मनुष्याच्या मनांतील सुखदु:ख, लाभालाभ, इच्छाद्वेष इत्यादिकांसंबंधींच्या वासनांची पर्वा न करितां त्याला नेमलेल्या वेळीं खेचून नेणाऱ्या कालाकडे दृष्टि कायम ठेवून मुमुक्षूनें असलेल्या जीवितापैकीं सद्गुरु-भजनाशिवाय एक क्षणार्धही व्यर्थ दवडूं नये.

**सूत्र ७८ ॥ अहिंसासत्यशौचदयास्तिक्यादि चारित्र्याणि परिपालनीयानि ॥**

**आर्या**:--॥ सत्त्वगुणाधारानें, वर्तावें नित्य साधकें कुशलें ॥
॥ तरिच तया साईची, अखंड लाभे कृपा सुपूर्णत्वें ॥

**विवरण**:-- भक्तिमार्गी साधकाला अहिंसा, सत्य, शौच, दया, आस्तिक्य इत्यादि उत्तम आचरणीय गुणांचें सक्रिय परिपालन करणें अत्यावश्यक आहे.

---

टीप:—ह्या सूत्रत्रयावरील कांहीं वर्षांमागें प्रथमतः पाठविलेलें विवेचन संपादकांकडून गहाळ झाल्याकारणानें हें श्लोकविवेचन ता. ९-१०-३४ रोजीं पुनः पाठवीत आहें. ह्याची पूर्णता श्री. लक्ष्मणराव पांगारकर यांच्या पुस्तकाधारें वाचकांनीं करून घ्यावी. माझ्या साईभावदीपिकेच्या प्रकाशनांत छंदोभंगाच्या वगैरे अनेक चुका झाल्या आहेत; परंतु जें होऊन गेलें त्याला आतां उपाय नाहीं.

नीलकंठ रामचंद्र सहस्रबुद्धे

# श्री साईबाबा

## सप्टेंबर महिन्याचें शिर्डीवृत्त

गेल्या ऑगस्ट महिन्याप्रमाणें या महिन्यांत श्रावण व भाद्रपद महिने असल्यामुळें सुमारें २० भक्तजन श्रीसमाधिदर्शनाकरितां येऊन गेले. ते अहमदनगर-पारनेर, पुणें, नारायणगांव,आळे,-जि. पुणे, पंढरपूर, ओढांगी,-जि. कुलाबा, गदग, गुंतकल या ठिकाणांहून आले होते. ह्या मंडळींत पंढरपुर येथील रा. रा. रामचंद्र एकनाथ मांगले, स्कूल लोकल अथॉरिटीचे चेअरमन, रा. रा. वाय. जी. जोशी वकील, गदग येथील स्ट्रस कं. चे एजंट श्रीयुत अब्रदल हाजी व त्यांचे कुटुंब, मुंबइचे श्रीयुत व्ही. आर. गडकरी वगैरे मंडळी होती.

१ पारनेरचे सब रजिस्ट्रार रा. रा. गजानन शिवराम पाटणकर यांनीं श्रीसाईबाबांच्या समाधिमंदिरांत रोज रात्रीं श्रींच्या समाधीवर घालीत असलेली श्रीसाईबाबाची मच्छरदाणी जीर्ण झाली होती, त्याची शिर्डीसंस्थान-कमिटीपुढें त्यांत त्या मच्छरदाणीची पूजा करण्याकरितां पाहिजे म्हणून ती विकत देण्याबद्दल मागणी केल्यावरून ती रु. २५ ह्या किंमतीस विकत घेतली व ती ते शिर्डीस येऊन घेऊन गेले.

२ मागील आगस्ट महिन्याच्या वृत्तांत शिर्डीगांवांत दुफळी झाली होती असा उल्लेख केला होता. आतां श्रीकृपेकरून ता. २-९-३४ रोजीं कोपरगांवचे मामलतदार गांवांत येऊन गांवांतील लोकांची श्रीसमर्थांच्या चरणावर हात ठेववून शपथा घेववून एकी केली. ह्या कामांत कोपरगांवचे वकील श्रीयुत देशमुख, डॉ. मेथा व शिर्डी संस्थानचे दुय्यम ऑ. चिटणीस श्रीयुत बापूराव रा. बोरावके यांनींही एकी करण्याच्या कामात मदत केली.

३ रा. रा. दौलाशा ऊर्फ दत्तात्रय दामोदर रासने नगरचे राहणार ह्यांनीं श्रीगुरुपौर्णिमेपासून शिर्डी येथें मुक्काम केला व ते श्रींपुढें कोणत्या ना कोणत्या रीतीनें रोज रात्रीं ७॥ ते ९ वाजेपावेतों संगीत भजनी पदांचें गायन आजपर्यंत करीत असतात. त्यांचे वडील नगरचे रा. रा. दामोदर सावळाराम रासने हे जुने साईभक्त आहेत, त्याचप्रमाणें त्यांचे चिरंजीव रा. रा. दत्तात्रय त्यांचा उत्तम कित्ता गिरवितात.

४ शिरडी येथील मारुतीचें देवालय जें पडीत आलें असतां श्रीसाईबाबा यांनी जिर्णोद्धार केला, त्या देवालयांत ता. २०।९।३४ रोजीं श्रीरामविजयग्रंथाची समाप्ति होती, त्या दिवशीं दोन वाजतां दुपारीं देवालयांतील दोन्हीं मारुतीच्या मूर्तींचीं शेंदराचीं कवचें आपोआप गळून पडलीं व आंतील मूर्ति दृष्टीस पडल्या. त्या मूर्ति चांगल्या घडीव असून फार सुंदर आहेत.

५ श्रींस भक्तमंडळीचें अभिषेक व नैवेद्य श्रावण महिन्यानिमित्त व त्यांचे मनोरथ पूर्ण झाल्याबद्दल झाले. रा. रा. दत्तात्रय दा. रासने यांनीं श्रीस दुधाचा अभिषेक केला. श्रीयुत बाबासाहेब यांच्या पत्रावरून हैद्राबाद दक्षिण येथील रा. रा. भोलागिर राजा यांच्या आत्यासासू श्रीमती पुतळाबाई यांचा ता. १६।९।३४ रोजीं श्रींस अभिषेक–नैवेद्य झाला.

## ६ जिनसा, देणग्या वगैरे आल्या त्याचा तपशील

१ रा.रा. विठ्ठल बाळाजी कुंभकर्ण–नगर–२॥ वार इमिटेशन कपडा

२ गजानन शि. पाटणकर रु. २२-८-९ कायम फंड

३ सौ. इंदिराबाई गुप्ते–भोर ,, ५–०–० ,, ,,

४ सौ. गुलाबबाई राजे–अंधेरी ,, ५–०–० ,, ,,

५ रा. रा. गोविंद नामाजी पाटील, ओढांगी–पेण, रु. १३–०–०

६ रामचंद्र श्रीपद कुडतरकर, दादर, मुंबई, कै. सौ.राधाबाई रामचंद्र कुडतरकर हिच्याप्रित्यर्थ १ पितळी ताट, १ दुशाल.

७ रा. रा. वामनराव गोविंद पाटील हस्तें रा. रा. श्रीपाद रा. कुडतरकर १ गुरुस्मृति पुस्तक.

८ श्रीमती पिरोजबाई रामराव कोठारे, आगस्ट व सप्टेंबर महिन्याच्या शिरडी येथील कै.नवलकर यांच्या वाड्यांतील निंबाखालीं दिवाबत्ती लावण्याबद्दल रु. ४

कल्याणचे एक जुने व निस्सीम साईभक्त रा. रा. त्रिंबक आनंदराव कर्णिक हे त्यांच्या वयाच्या ७२ व्या वर्षी श्रीसाईचरणी ता. १ मे १९३४ रोजीं लीन झाले. आद्यसाईभक्त कै. नारायण गोविंद चांदोरकर

यांचे ते बालपणापासून मित्र होते व शिरडी संस्थानच्या भक्तमंडळाचे तहा-हयात सभासद होते. ते सन् १९३२ च्या श्रीरामनवमीउत्सवांत शेवटचें श्रीसमाधीचें दर्शन घेऊन गेले. श्रीसाई त्यांच्या आत्म्यास शांती देवो. त्यांच्या सर्व चिरंजीवांनींही वडिलांची परंपरा राखिली असून ते सन १९३३ व १९३४ च्या रामनवमीउत्सवास आप्त व मित्रमंडळीसह शिरडी येथें श्रीसमाधिदर्शनास आले होते.

८ गेल्या गुरुपौर्णिमेच्या वेळीं ठाण्याचे श्रीयुत श्रीधर नारायण खारकर यांच्या ८२ वर्षांच्या वयोवृद्ध मातुःश्रींनीं शिरडी येथें श्रींच्या समाधि-दर्शनास पाऊसपाण्याचे व गोदावरीवरील नांवेच्या हालांची परिस्थिति त्यांज-पुढें मांडली असतां, त्या हालांच्या वर्णनास न जुमानतां श्रीसाईदर्शनास शिर्डी येथें जाण्याबद्दल त्यांनीं आपल्या चिरंजीवाजवळ आग्रह धरून त्याप्रमाणें शिरडीस जाउन घरीं आनंदानें परत आल्या. त्यांचे श्रींच्या दर्शनानें मनोरथ पूर्ण होऊन घरीं परत आल्यावर पंधरा दिवसांनंतर आजारी पडून त्या लवकर हा इहलोक सोडून श्रीसाईलीन झाल्या. श्रीसाई त्यांच्या आत्म्यास शांती देवो. ह्यावरून मी माझ्या माणसास चिडीसारखें खेचून आणतों ह्या श्रीसाईबावांच्या म्हणण्याची आठवण होते. त्यांचे चि. श्रीयुत श्रीधर नारायण खारकर यांनीं त्यांच्याप्रीत्यर्थ दशदानः व अष्ट-दानाबद्दल रु. ४–८–० ची रक्कम संस्थानच्या कायम फंडाकरितां दिली व त्याचप्रमाणें मातुःश्रींच्या भरणीश्राद्धाप्रीत्यर्थ १–४–० कायम फंडाकरितां दिले.

९ श्रीमंदिरांतील पेटी व श्रीद्वारकामाईंतील पेटया ता. ९।९।३४ रोजीं उघडल्या, त्यांत अनुक्रमें रु. ४२–४–० व रु. २ जमले होते.

१० शिरडी गांवांत ग्रामपंचायत स्थापून गांवांतील घाण काढून टाक-ण्याचीं व जागा स्वच्छ करण्याचीं कामें चालू आहेत. त्याचप्रमाणें रस्त्यांत घरापुढें ओटे बांधून सार्वजनिक जागेवर आक्रमण केलें होतें, अशा घरांसमो-रील ओटे काढून टाकण्याचें कामही चालू आहे. त्याकरितां कोपरगांवचे मामलतदार हे शिरडीस आले होते.. त्यांनीं शिरडी येथें समाधिमंदिरांत

दोन दिवस मुक्काम केला होता. पूर्वीचे ऑ. दुय्यम चिटणीस रा.रा. रामचंद्र पाटील यांनीं त्यांच्या श्रीसमाधिमंदिराजवळील घरांत पिठाची गिरण घालण्याकरितां जागा दिली आहे. त्यामुळें त्याच्या आवाजामुळें श्रीसमाधी मंदिरांत त्रास होतो. रा. रामचंद्र पाटील हे श्रीसाईभक्त आहेत. एकदा शिर्डी संस्थान कमिटीचे ते कार्यवाहक होते. त्यांनीं हा नवीन त्रास काढण्याबद्दल करावें अशी त्यांस नम्र विनंती आहे.

११ शिरडी संस्थान कमिटीच्या पोटकमिटीची सभा सान्ताक्रुझ येथें रावबहादुर मोरेश्वर वि. प्रधान यांच्या बंगल्यात ता. ९ सप्टेंबर १९३४ रोजीं दोनप्रहरीं भरली होती. त्या वेळीं श्रीसमाधिमंदिरासमोरील खुल्या जागेवर सभामंडप बांधण्याबद्दलच्या कामाचा विचार झाला. नगरचे रा. रा. दामोदर सावळाराम रासने यांनीं तूर्त सुमारें रु. १००० मिळवून देण्याबद्दलची खटपट करून रक्कम पाठवून देतों म्हणून कळविल्यावरून तात्पुरता सभामंडप बांधण्याबद्दलचें काम तूर्त रहित करावें लागलें. रा. रा. रासने यांचें म्हणणें असें आहे कीं, एकदा कायमचा मजल्याचा शोभिवंत सभामंडप बांधावा. अशा सभामंडपास रु. ८ ते १० हजार खर्च येईल. व येवढी रक्कम जमेपर्यंत सभामंडपाचें काम लांबणीवर टाकणें बरोबर नाहीं, म्हणून शिरडी संस्थान कमिटीनें तात्पुरता सभामंडप उभारण्याकरितां ठरावही मंजूर केला आहे व त्याबद्दलच्या खर्चाकरितांही रक्कम मंजूर झाली आहे. एवढें मात्र खरें कीं, श्रीसमाधिमंदिरास शोभेसा समोर बाजूस सभामंडप बांधल्यानें श्रीसमाधिमंदिरासही जास्त शोभा येईल. नागपूरचे श्रीमंत बुटीबंधू त्यांच्या वडिलांच्या श्रीसाईसेवेंत परंपरा ठेवीत आहेत व त्यांनीं मनावर घेतल्यास त्यांच्या हातून हें सभामंडपाचें काम सहज होण्यासारखें आहे. त्यांस श्रीसाई सभामंडप बांधण्याच्या कामीं बुद्धि देवो, असें इच्छितों.

१२ गेल्या महिन्यांत हवापाणी चांगले होतें व पाऊस साधारण होता. सध्याही हवा चांगली आहे.

साईभुवन,
१४१, प्रिन्सेस स्ट्रीट,
मुंबई, ता. ६ ऑक्टोबर १९३४

सुंदरराव दि. नवलकर,
ऑ. चिटणीस, शिर्डी संस्थान कमिटी.

## वर्गणीदारांकरितां

१ श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याच्या अंकापासून आहे. नवीन वर्गणीदारांस वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ पत्ता बदलणें झाल्यास लगेच आम्हांस कळवावें. बदललेला पत्ता न कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

३ अंकासंबंधीं पत्रव्यवहार आमच्याकडे करावा.

४ लेखासंबंधीं पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा.

## वार्षिक वर्गणी

वार्षिक वर्गणी टपालखर्चासह मनिऑर्डरनें आगाऊ रु. ३।=, व्ही. पी. नें रु. ३॥, फुटकळ अंक ।=, मागील अंकास शिल्लक असल्यास -॥-

व्यवस्थापक—श्रीसाईलीला

## लेखकांकरितां

१. श्रीसाईलीलेंत प्रसिद्धीसाठीं पाठविलेला लेख अथवा कविता कागदाच्या एका बाजूवर, मार्जिन सोडून, सुवाच्य बालबोध लिपींत असावी. पेन्सिलीनें किंवा कागदाच्या दोन्हीं बाजूंस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध न करितां टोपण नांवाखालीं प्रसिद्धि द्यावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवावें.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंती अगर नापसंती कळविली जाईल. पसंती कळविल्यानंतर, आम्हांला कळविल्याशिवाय लेखकांनीं तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमच्याकडे राहील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्हीं घेत नाहीं

५. लेखासोबत पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

प्रकाशक **श्रीसाईलीला**

दक्षिणा प्राइज कमिटीनें बक्षिस दिलेला व केसरी, चित्रमयजगत्, ज्ञानप्रकाश, विविधज्ञानविस्तार, व रत्नाकर वगैरे वृत्तपत्रें व मासिकांनी उत्कृष्ट अभिप्राय दिलेला असा संतकवि ह. भ. प. श्री दासगणूमहाराज ह्यांनी नवीन रचिलेला व प्रोफेसर श्री. नी. चापेकर, M. A., LL. B. ह्यांनीं प्रस्तावना लिहिलेला नवीन ग्रंथ

# श्री पासष्टी–भावार्थ–दीपिका

हा नरेंद्र बुक डेपो, दादर, मुंबई येथें मिळेल.

कापडी प्रत १० आणे. साधी प्रत ८ आणे.

सर्व प्रकारचे मेंदूच्या विकारांवर आग्रण व मानसिक श्रम करणाऱ्यांस अत्यंत उपयोगी

नकलेपासून ] **ब्राह्मी तेल** [ सावध रहावें.

## बाळबाळंतिणीकरितां औषधें

बाळंतकाढा नं १—पहिल्या दहा दिवसांचा ८१४; बाळंतकाढा नं. २ दहा दिवसानंतर ८१४; बाळकडू:—मूल जन्मल्यापासून देण्यास योग्य ८८; कुमारीआसव लहान मुलांकरितां ८१२.

सतत २५ वर्षें लोकादरास पात्र झालेलें, कोणत्याही ऋतूंत घेण्यास योग्य, अत्यंत मधुर व आरोग्यदायक

एक रत्तल १८१० ) **द्राक्षासव** ( अर्धी रत्तल ८१४
दीड रत्तल २८४ ट. ख. पं. नि.

शिवाय आमच्या कारखान्यांत टिकाऊ तयार काढे, आसवें, अरिष्टें, भस्में वगैरे ५०० वर औषधें तयार आहेत. त्यांच्या माहितीचा मोठा कॅटलाग व प्रकृतिमान भरून पाठविण्याकरितां "ऋण–पत्रिका" ही सात आण्यांची तिकिटें आलीं असतां पाठवूं.

**दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स.** आर्यौषधी कारखाना, चेंबूर, जि. ठाणें.

टे. नं. ८७०२४ × २२२७८. दुकान दवाखाना, ठाकुरद्वार, मुंबई नं० २

पुणें: – श्री साईनाथ आणि कंपनी

हें पुस्तक श्रीलक्ष्मीनारायण छापखाना, ३६४ ठाकुरद्वार, मुंबई येथें रामचंद्र काशीनाथ तटणीस यांनीं छापून रा. आ. तर्खड यांनीं ५ सेंट मार्टिन्स रोड. बांद्रें येथें प्रसिद्ध केलें.